# दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर

Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
UGC-CPE, DST-FIST, NAAC Re-Accredited "A" Grade College, Best College Award, Best Principal Award

**सहसंचालक कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड व दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर**

**यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हास्तरीय मार्गदर्शन शिबीर**

**विषय: मतदार जनजागृती** **दि. 25 जानेवारी, 2022** **वेळ: सकाळी 11.30 वाजता**

---

- **स्थळ:** मायक्रोसॉफ्ट टीम्स ॲप
- **सहभागी विद्यार्थी:** 519
- **अतिथी व मार्गदर्शक :**
  1. **मा. श्री. डॉ अशोक उबाळे** (विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्चशिक्षण, सोलापूर महाराष्ट्र राज्य)
  2. **प्रा. श्री. डॉ संतोष पाटील** (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, लातूर)
- **अध्यक्ष** : मा. डॉ. जे. एस. दरगड (प्राचार्य दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर)
- **उपस्थिती**:
  1. **डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे**, उपप्राचार्य, द. वि. म. लातूर
  2. **डॉ. श्रेयस माहुरकर**, द. वि. म. लातूर
  3. **डॉ. कोमल गोमारे**, द. वि. म. लातूर
- **आयोजक**: मतदान जनजागृती समिती, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर
  1. **डॉ. एस. एन. इबाते** ( नोडल कॉर्डिनेटर, निवडणूक साक्षरता मंडळ, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर)
  2. **डॉ. रामशेट्टी शेटकार** (मराठी विभाप्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर)
  3. **डॉ. गजानन बने** (हिंदी विभाप्रमुख सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर)
  4. **प्रा. श्वेता मदने** (सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर)
- **कार्यक्रमाचा मुख्य उद्देश:**

  या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विविध महाविद्यालयातील 18 वर्षे पूर्ण झालेल्याना मतदार नोंदणी करावी तसेच याचे महत्त्व काय आहे, आपला एक मतदानाचा हक्क राष्ट्राच्या प्रगतीला कसा उभारी देऊ शकतो याबद्दल एक जबाबदार नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय आहे, याची जाणीव करून देण्यासाठी हे एक माध्यम आहे. आपले नाव मतदान यादीत असूनही आपण मताधिकार बजावत नाही कारण आपण स्वतःचं अस्तित्व व एका बोटावर च्या शाळेची किंमत जाणत नाही. याची जनजागृती करून देण्यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन निवडणूक साक्षरता मंडळ करत असते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील नागरिकांना आपल्या मताचा वापर करण्याबाबत जागृत करणे जेणेकरून योग्य प्रतिनिधी निवडता येईल आणि देशाचा विकास योग्य दिशेने होऊ शकेल.

भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाहीप्रधान राष्ट्र असून लोकशाही सक्षमीकरणासाठी भारतातील प्रत्येक नागरिकांनी पुढे पाऊल टाकले पाहिजे.18 वर्ष पूर्ण झालेल्या युवकांनी,तरुणाईनी आपला मतदानाचा मूलभूत हक्क बजावला पाहिजे.निवडणूक प्रक्रियेत मतदारांनी निपक्ष:पातीपणे केलेले मतदान लोकशाहीला बळकटी देत असते.मतदान हे सर्वश्रेष्ठ दान असून एका मतामध्ये संपूर्ण सत्ता बदलण्याची ताकद असते.म्हणून मतदान नाही केले तर एका मताने काय होणार आहे ही संकुचित मानसिकता बदलली पाहिजे.गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंतच्या सार्वत्रिक मतदान प्रक्रियेत प्रत्येक भारतीय नागरिकांनी मतदान केलेच पाहिजे, लोकशाही सक्षमीकरण आणि शंभर टक्के मतदानासाठी मतदार जनजागृतीची आवश्यकता आहे,असे प्रतिपादन सोलापूर येथील विभागीय शिक्षण सहसंचालक,उच्चशिक्षण विभाग डॉ.अशोक उबाळे यांनी केले.

लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि सहसंचालक कार्यालय,नांदेड विभाग,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.25 जाने.2022 रोजी ' राष्ट्रीय मतदार दिना' च्या निमित्ताने ' मतदार जनजागृती ' या विषयावर एक दिवसीय जिल्हास्तरीय मार्गदर्शन ऑनलाईन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.शिबिराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे दयानंद कला महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संतोष पाटील,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,नोडल कॉर्डिनेटर डॉ.श्याम इबाते,डॉ.गजानन बने,डॉ.श्रेयस माहुरकर,डॉ.कोमल गोमारे,डॉ.रामशेट्टी शेटकार,प्रा.श्वेता मदने,तांत्रिक समन्वयक डॉ.रोहिणी शिंदे व सचिन पंतगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ.संतोष पाटील म्हणाले की, प्रत्येक भारतीय नागरिकांचे मत अमूल्य असून ते राष्ट्र व लोकशाहीनिर्मितीचा भक्कम असा पाया आहे.म्हणून प्रत्येक भारतीय नागरिकांनी जात,धर्म,वंश,वर्ण,भाषा,प्रांत असा कोणताही भेदभाव न करता आणि कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान केले पाहिजे.युवकांनी,विद्यार्थ्यांनी स्वतः मतदान करीत व इतरांनाही प्रोत्साहन देत मतदार जनजागृती केली पाहिजे.मतदार जनजागृती रॅली काढली पाहिजे.भारतीय संविधानाने मतदानाचा दिलेला हक्क बजावून देशाचा विकास व प्रगतीत सक्रीय सहभाग नोंदवला पाहिजे,असे ते म्हणाले.


अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,मतदार जनजागृती करणे ही आधुनिक काळाची गरज आहे.कारण दिवसेंदिवस मतदानाविषयी वाढणारी उदासीनता व घसरणारी शेकडेवारी यामुळे निवडणुकीत भारतीय लोकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने 2011 सालापासून भारत सरकारने भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिन 25 जाने.हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो.शासनाचे परिपत्रक, भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क आणि देशाच्या लोकशाही सक्षमीकरणासाठी प्रत्येक भारतीय नागरिकांनी,विद्यार्थ्यांनी सार्वत्रिक मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवून आपले कर्तव्य बजावले पाहिजे,यातूनच लोकशाही बळकट होते.म्हणूनच मतदार जनजागृतीची गरज आहे,असे ते म्हणाले.

प्रास्ताविक डॉ.कोमल गोमारे यांनी केले तर आभार डॉ.गजानन बने यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.श्वेता मदने यांनी केले व प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी करून दिला.यावेळी विभागीय सहसंचालक उच्चशिक्षण विभाग डॉ.अशोक उबाळे यांच्यासमवेत राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने सर्वांनी शपथ घेतली.शहीद भगतसिंग महाविद्यालय,किल्लारी येथील वर्षा कुंभार,महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर येथील प्रथमेश देशपांडे आणि दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रामराजे काळे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील प्राचार्य,प्राध्यापक,विद्यार्थी यांच्यासह राजमाने विदुला,कोकरे,चेतन घोडके आणि शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकूण 519 जण उपस्थित होते.




**कार्यक्रम पत्रिका**

| | | |
|---|---|---|
| **स. ११.३० ते ११.३५** | स्वागत | **प्रा. श्वेता मदने**<br>(सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर) |
| **स. ११.३५ ते ११.४०** | प्रास्ताविक | **डॉ. कोमल गोमारे**<br>(सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर) |
| **स. ११.४० ते ११.५०** | स्वागतपर भाषण | **डॉ. जयप्रकाश दरगड**<br>(प्राचार्य, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर) |
| **स. ११.५० ते १२.००** | विध्यार्थी मनोगत | **विध्यार्थी** |
| **दु. १२.०० ते १२.१०** | मार्गदर्शन व शपथग्रहण | **मा. श्री. डॉ. अशोक उबाळे**<br>(विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्चशिक्षण, सोलापूर महाराष्ट्र राज्य) |
| **दु. १२.१० ते १२.१५** | प्रमुख पाहुण्यांचे परिचय | **डॉ. रामशेट्टी शेटकार**<br>(सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर) |
| **दु. १२.१५ ते १२.४५** | प्रमूख पाहुण्याचे मार्गदर्शन | **मा. श्री. डॉ. संतोष पाटील**<br>(राज्यशास्त्र विभाग प्रमुख,<br>दयानंद कला महाविद्यालय, लातूर) |
| **दु. १२.४५ ते १२.५५** | विद्यार्थ्यांची प्रश्नउत्तरे | **विदयार्थी** |
| **दु. १२.५५ ते १.००** | आभार प्रदर्शन | **डॉ. गजानन बने**<br>(सहाय्यक प्राध्यापक, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर) |
| **राष्ट्रगीत सांगता** | | |




Nodal Coordinator

IQAC Coordinator

IQAC - Coordinator
Dayanand Science College,
Latur, M.S. (INDIA)

Principal

Principal
Dayanand Science College
LATUR 413512

(Electoral Literacy Cell,

Dayanand Science College, Latur)